# मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांनी नवीन डिजिटल सेट मॅनेजमेंट प्रणाली-सुगम रेल आणि रेल-अर्थ डिजिटल ॲप्सचे उद्‌घाटन

**सोलापूर/प्रतिनिधी :** श्री धर्मवीर मीना मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांनी अलीकडेच मालमत्ता व्यवस्थापनासाठी सुगम रेल आणि रेल-अर्थ या दोन डिजिटल अनुप्रयोगांचे (ॲपचे) उघाटन केले.

ही अनुप्रयोगं (ॲप्स) अंतर्गत पातळीवर विकसित करून मध्य रेल्वेच्या आधुनिकीकरण उपक्रमाचा एक भाग म्हणून विद्युत विभागामार्फत श्री अनुप कुमार अग्रवाल, प्रधान मुख्य विद्युत अभियंता, मध्य रेल्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली आहेत. ही अनुप्रयोगे (ॲप्स) पारंपरिक कागदाधारित प्रक्रिया संपवून केंद्रीकृत, डेटा-आधारित मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली उपलब्ध करून देतील, ज्यामुळे संपूर्ण रेल्वे नेटवर्कमध्ये सुरक्षा आणि विश्वासार्हता वाढेल.



श्री प्रतीक गोस्वामी, अतिरिक्त महाप्रबंधक ; श्री अनुप कुमार अग्रवाल, प्रधान मुख्य विद्युत अभियंता ; प्रधान विभागप्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारीही यावेळी उपस्थित होते.

संक्षेप - सुगम रेल आणि रेल-अर्थ

सुगमरेल: लिफ्ट आणि एस्केलेटरसाठी: सुगम रेल हे एस्कलेटर आणि लिफ्टच्या देखभाल व बिघाड विश्लेषणासाठी तयार केलेली एक सर्वसमावेशक मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली आहे. हे प्लॅटफॉर्म पूर्णपणे कागदविरहित असून देखभाल वेळापत्रकं आणि तपासणी अहवालांचे डिजिटायझेशन करते.

**प्रोक्टिव्ह मेंटेनन्स:** ही प्रणाली वारंवार होणाऱ्या बिघाडांबाबत आणि देखभालीची नियोजित मुदत चुकल्यास त्वरित अलर्ट पाठवते, ज्यामुळे वेळेत लक्ष दिले जाऊन उच्च दर्जाचे अनुपालन सुनिश्चित होते.

**परफॉर्मन्स इन्साईस:** ही प्रणाली प्रत्येक मालमत्तेनुसार आणि बिघाडाच्या कारणानुसार सविस्तर विश्लेषण प्रदान करते. मालमत्तेची विश्वासार्हता तपासण्यासाठी मीन टाइम बिटविन फेल्युअर्स (एमटीबीएफ) आणि मेंटेनन्स कंप्लायन्स रेट यासारखे मुख्य कार्यक्षमता निर्देशक (केपीआय) वापरले जातात.

**सेंट्रलाईझ मॉनिटरिंग:** रोल-आधारित प्रवेश नियंत्रण प्रणाली प्रत्येक स्तरावर

- डेपोपासून मुख्यालयापर्यंत
- मालमत्तेची स्थिती (गंभीर, लक्ष देण्याची गरज, बिघाड) रिअल-टाइममध्ये निरीक्षण करण्यास सक्षम करते.

सुगम रेल अनुप्रयोग (प्स)अनेक फायदे प्रदान करतात, त्यामध्ये समाविष्ट आहेत -

प्रवाशांचा अनुभव वाढवला: सुगम रेल एस्केलेटर आणि लिफ्टचे सुरळीत आणि सतत ऑपरेशन सुनिश्चित करते, प्रवाशांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला आणि शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींना सोयीस्कर आणि त्रासमुक्त अनुभव प्रदान करते.

बिघाडांमध्ये घट: सुगम रेलद्वारे नियमित देखरेखीमुळे संभाव्य समस्या ओळखता येतात, ज्यामुळे बिघाड होण्याची शक्यता कमी होते आणि वेळेवर देखभाल सुनिश्चित होते.

**जलद समस्यानिवारण:** बिघाड झाल्यास, सुगम रेल एस्केलेटर आणि लिफ्टचे जलद समस्या निवारण आणि पुनर्संचय सुनिश्चित करते, ज्यामुळे डाउनटाइम आणि प्रवाशांना होणारा त्रास कमी होतो.

**सुधारित देखभाल:** हा अनुप्रयोग (ॲप्स) सक्रिय देखभाल सक्षम करते, नियोजित दुरुस्तीसाठी परवानगी देते त्यामुळे अनपेक्षित बिघाडांचा धोका कमी करते.

वाढलेली सुलभता: एस्केलेटर आणि लिफ्टच्या विश्वासार्ह कार्यक्षमतेची खात्री करून, सुगम रेल सर्व प्रवाशांसाठी, विशेषतः गतिशीलतेच्या समस्या असलेल्या प्रवाशांसाठी सुलभता आणि समावेशकतेला प्रोत्साहन देते.

सर्वसाधारणपणे, सुगम रेल रेल्वे प्रणालीला अधिक कार्यक्षम, विश्वासार्ह आणि प्रवासी अनुकूल बनवण्यास मदत करते.

**रेल-अर्थ:** इलेक्ट्रिकल अर्थिंग पिट्ससाठी रेल-अर्थ हे रेल्वेच्या विद्युत अर्ध-ग्राउंडिंग पिट्सचे व्यवस्थापन पारंपरिक पद्धतीतून केंद्रीकृत, डेटा-आधारित ऑपरेशनमध्ये रूपांतरित करते. प्रत्येक पिट्सला एक अद्वितीय क्रमांक दिला जातो, ज्यामुळे कर्मचारी स्थानक, संबंधित मालमत्ता आणि तपासणी इतिहास यासह माहिती सहज मिळवू शकतात.

**सुरक्षा अलर्ट:** हा अनुप्रयोग अस्वस्थ पिट्स (प्रतिरोध श ५), विलंबित तपासण्या आणि कधीही तपासल्या नसलेल्या पिट्ससाठी त्वरित अलर्ट प्रदान करतो.

सुलभ अहवाल प्रणाली: हे कार्यक्षम नियोजन आणि अहवाल सादरीकरणास मदत करते, ज्यात अनिवार्य पूर्व-मॉनसून अनुपालन अहवाल देखील समाविष्ट आहे, ज्यामुळे वेळेवर सुरक्षा तपासण्या सुनिश्चित होतात.

**वाढलेली जबाबदारी:** हा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी अधिक जबाबदारी आणि प्रोक्टिव्ह दृष्टिकोन प्रदान करतो.रेल्वे अर्थिंगमुळे अनेक फायदे मिळतात, ज्यात समाविष्ट आहे

**वाढलेली सुरक्षितता:** रेल-अर्थ अर्थिंगमुळे जनतेला आणि कर्मचाऱ्यांना विद्युत धक्क्याचा धोका टाळता येतो, ज्यामुळे सुरक्षित कार्यपरिसर सुनिश्चित होतो.

जोखीम कमी करणे: योग्य अर्थिंग कनेक्शनमुळे विद्युत अपघाताचा धोका कमी होतो आणि लोकांना संभाव्य हानीपासून संरक्षण मिळते.

विद्युत प्रणालींचे संरक्षण: रेल-अर्थ अर्थिंगमुळे विद्युत प्रणाली आणि उपकरणांचे नुकसान टाळता येते, ज्यामुळे डाउनटाइम आणि देखभाल खर्च कमी होतो.

सुरक्षा नियमांचे पालन: रेल-अर्थ अर्थिंग अंमलात आणल्यास विद्युत सुरक्षा निकष आणि नियमांचे पालन सुनिश्चित होते, तसेच संस्थेत सुरक्षा संस्कृतीला प्रोत्साहन मिळते.

विद्युत शॉक प्रतिबंध: रेल अर्थिंगमुळे विद्युत प्रवाह जमिनीवर वाहण्यासाठी सुरक्षित मार्ग मिळतो, ज्यामुळे विद्युत शॉक टाळता येतात आणि व्यक्तींचे रक्षण सुनिश्चित होते. रेल्वे अर्थिंगला प्राधान्य देऊन, संस्था सुरक्षित आणि विश्वासार्ह विद्युत पायाभूत सुविधा सुनिश्चित करू शकतात, ज्यामुळे लोक आणि उपकरणे दोघांचेही संरक्षण होते. सुगम रेल आणि रेल-अर्थ हे दोन्ही अनुप्रयोग मध्य रेल्वेसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून कार्यक्षमतेत सुधारणा, सुरक्षा आणि विद्युत साधनांच्या देखभालीसाठी अधिक विश्वासार्ह प्रवास सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरतात.

# शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्याहस्ते शिवसेना संलग्न राष्ट्रीय कर्मचारी सेना औसा आगार युनियच्या नामफलकाचे अनावरण

**औसा/प्रतिनिधी :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंदराव दिघे यांच्या शिवसेना विचारांनी प्रेरित राज्याचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे आणि राष्ट्रीय कर्मचारी सेना केंद्रीय अध्यक्ष श्री किरणजी पावसकर यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर शिवसेना जिल्हा प्रमुख श्री शिवाजीराव माने यांच्या शुभहस्ते शिवसेना संलग्न राष्ट्रीय कर्मचारी सेना औसा आगार युनियनच्या संघटना बोर्डाचे अनावरण पुष्पहार घालून करण्यात आले.



सदर कार्यक्रमास औसा शिवसेना तालुका प्रमुख तानाजी सुरवसे राष्ट्रीय कर्मचारी सेना राज्यचिटणीस श्री व्यंकटराव बिरादार विभागीय अध्यक्ष श्री सतीश राव पवार विभागीय सचिव श्री हर्षद केंद्रे, निलंगा आगार सचिव श्री संतोष भिंगोले श्री किरण पाटील, औसा राष्ट्रीय कर्मचारी सेना आगाराध्यक्ष श्री रमाकांत सगर औसा आगार सचिव श्री सचिन हवलदार औसा आगार कार्याध्यक्ष श्री बालाजी माळी,विद्यानंद टिंगरे, जाकीर रामपुरे, परवेज शेख, जीवन चव्हाण इत्यादी संघटना पदाधिकारी उपस्थित होते .

या नंतर शिवसेना जिल्हा प्रमुख श्री शिवाजीराव माने तालुकाप्रमुख श्री तानाजी सुरवसे , राष्ट्रीय कर्मचारी सेना राज्यचिटणीस श्री व्यंकटराव बिरादार यांच्या सह औसा आगार प्रमुख श्री स्वामी यांचा सत्कार शिवसेना जिल्हाप्रमुख श्री माने यांनी केला तसेच औसा आगार कार्यशाळा अधीक्षक श्री होळकर यांचा देखील सत्कार करण्यात आला, यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने म्हणाले की कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन असणाऱ्या समस्या इतर अधिकारातील असणारे प्रश्न या संदर्भात आगारप्रमुख यांनी राष्ट्रीय कर्मचारी सभेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे जेणेकरून आगारातील प्रश्न मार्गी लागल्यानंतर सर्व कर्मचारी अत्यंत उत्साहाने काम करतील आणि आपल्या आगाराची लौकिकता वाढेल. होय आज औसा आगाराची पाहणी केली असता सुंदर अशी बसस्थानकाची व्यवस्था असून साफसफाई सुरक्षा या बाबीकडे आगार प्रमुख यांनी अत्यंत चांगले नियोजन केलेले दिसून आले. भविष्यात राज्याचे परिवहन मंत्री आदरणीय प्रताप सरनाईक साहेब यांचा दौरा झाला तर नक्कीच आपण औसा आगारास भेट देण्यासाठी विनंती करू आणि आपल्या केलेल्या सर्व कार्याची प्रशंसा होईल अशा पद्धतीचे नियोजन आपण सर्वांनी मिळून करूया. नक्कीच भविष्य काळामध्ये कर्मचारी आगारप्रमुख बाकी अधिकारी या सर्वांच्या मेहनतीने आगार प्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट अशी नियोजन करून औसा आगार एक नंबरला कसे राहील यासाठीच नियोजन करावे. याकरता आम्ही सुद्धा आपल्या सोबत राहू अशी ग्वाही जिल्हाप्रमुख शिवाजी साहेब यांनी दिली . आगार प्रमुख औसा यांनी देखील राष्ट्रीय कर्मचारी सेनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली जाईल अशी ग्वाही दिली. सदर परिचय तसेच संघटना बोर्ड अनावरण कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री हर्षद केंद्रे विभाग सचिव यांनी केले तसेच श्री व्यंकटराव बिरादार साहेब यांनी कार्यक्रमाचे मनोगत व्यक्त केले आणि आभार प्रदर्शन श्री सचिन हवालदार यांनी केले.

# मोहन महाराज यांच्याकडून उपवासाच्या फराळाचे वाटप



**लातूर/प्रतिनिधी :** येथील संतोषी माता भक्त मोहन महाराज खंडेलवाल यांनी नवरात्राच्या उपवास करतात त्यांच्यासाठी फराळाचे वाटप करण्यात आले. लातूरपरिसरातील संतोषीमातेच्या भक्तासाठी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोहनमहाराज खंडेलवाल यांनी शाबुदान, शेंगदाने, भगर आदिचे वाटप घरोघरी जाऊन करण्यात आले. या त्यांच्या सततच्या उपक्रमाबाबत अनेक भक्तांनी मोहन महाराज खंडेलवाल यांना धन्यवाद दिले आहेत.

## ब्रह्मचारिणी ..

माळ द्वितीय गुंफता
जीवन हो सत्कारणी
रूप भावते साधका
श्रीमाता ब्रह्मचारिणी

तेज:पुंज गौरवर्णीय
रूप लोभस भावणी
खिळून राहती नयन
पायावर घेई लोळणी

कमंडलू ते एक हाती
दुजास माळ धारिणी
शुभ्र वस्त्रांकित आई
फिटे अक्षास पारणी

कठीण तप अपर्णेचे
जिंके शंकरा योगिनी
समर्थ कैलासाधिपती
शोभली सार्थ संगिनी

जाई जुई कमल फुले
वाहतो हेमा मालिनी
मनमाझे निर्मल करी
वर द्यावा तू शालिनी

दहीदुग्ध प्रिय तुजला
नैवेद्य ठेवे सौदामिनी
तवकृपा शुध्द प्रसाद
चित्तस्थीर हे कामिनी

स्वाधिष्ठान चक्र जागे
सत्कार्य घडो जीवनी
मोक्ष मोक्ष करत उगा
का फिरावे रानीवनी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.



# मित्र नगर कॉर्नर येथे नाल्यावरील जाळी गायब फोर व्हीलर अडकली; जीवितहानीचा धोका वाढला

**लातूर/प्रतिनिधी :** मित्रनगर कॉर्नर येथे फुटपाथलगत असलेल्या नाल्यावर जाळी नसल्याने रविवारी रात्री एक फोर व्हीलर वाहन थेट नाल्यात अडकले. या घटनेनंतर पुन्हा एकदा नागरिकांच्या सुरक्षेबाबत महापालिकेच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणची जाळी चोरट्यांनी जवळपास वर्षभरापूर्वी चोरून नेली असून, याची वारंवार तक्रार महापालिकेकडे करण्यात आली आहे. तरीदेखील आजतागायत जाळी बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे येथे वारंवार अपघात घडत असून, यापूर्वी एका लहान मुलाची सायकल नाल्यात अडकून त्याला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली होती.

रहिवाशांचे म्हणणे आहे की, महापालिकेने कायमस्वरूपी उपाययोजना करून या नाल्यावर मजबूत जाळी बसवावी, अन्यथा कधीही मोठा अपघात होऊन जीवितहानी होऊ शकते.

महापालिकेनं तातडीने पावले उचलून या धोकादायक स्थितीतून दिलासा देण्याची मागणी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# परिमंडळातील एक लाख ६९ हजार घरगुती वीज ग्राहकांना मिळाली २६ लाख रूपयांची सवलत

## टीओडी मीटर बसवा, वीज बिलात सवलत मिळवा

**लातूर/प्रतिनिधी :** स्मार्ट मीटर (टीओडी मीटर) बसवलेल्या लातूर परिमंडळातील १ लक्ष ६९ हजार ४६१ वीजग्राहकांना जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या वीज युनिटसाठी वीजबिलात २६ लक्ष ९३२ रुपयांची सवलत मिळाली आहे. यात लातूर मंडळातील ९३ हजार ७६४ ग्राहकांना जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यात दिवसा वापरलेल्या वीज युनिटसाठी वीजबिलात १३ लक्ष ७८ हजार ४७९ रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे. तर धाराशिव मंडळातील ३९ हजार ६४ वीजग्राहकांना ५ लक्ष ३७ हजार ८८२ तसेच बीड मंडळातील ३६ हजार ६३३ वीजग्राहकांना ६ लक्ष ८४ हजार ५७१ रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे.

महावितरणकडून राज्यात ग्राहकांना मोफत स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने औद्योगिकग्राहका नंतर घरगुती ग्राहकांना प्रथमच १ जुलै २०२५ पासून दिवसाच्या वीज

| विभाग | ग्राहक संख्या | मिळालेली सवलत (रू) |
|---|---|---|
| आंबाजोगाई | २६३१८ | ४,८९,४५६ |
| बीड | १०३१५ | १,९५,११४ |
| धाराशिव | ३६६३३ | ६,८४,५७१ |
| तूळजापूर | १५०४८ | १,५६,४९२ |
| लातूर | ५३०९९ | ९,१३,६१९ |
| निलंगा | १७५७८ | १,५५,८२० |
| उदगीर | २३०८७ | ३,०९,०४० |



वापरामध्ये (टीओडी) प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपया सवलत जाहीर केली आहे. महावितरणच्या टीओडी मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या विजेच्या युनिटसाठी १ जुलै २०२५ पासून प्रती युनिट ८० पैसे टीओडी (टाईम ऑफ डे) सवलत लागू झाली आहे. पुढील पाच वर्षांसाठी निश्चित केलेल्या वीजदरामध्ये मार्च २०२६ पर्यंत ८० पैसे, सन २०२६-२७ करिता ८५ पैसे, सन २०२७ ते २०२९ करिता ९० पैसे तर सन २०२९-३० मध्ये १ रुपये प्रतियुनिट सवलत जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार घरगुती ग्राहकांना टीओडीप्रमाणे वीजदरात सवलत मिळण्याचा प्रत्यक्ष फायदा १ जुलैपासून सुरू झाला आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी टीओडी मीटर घरगुती ग्राहकांकडे बसविणे आवश्यक आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे मीटरचे रीडिंग ऑटोमॅटिक होणार आहे. परिणामी मानवी हस्तक्षेप टळून अचूक बिले मिळणार आहेत. तसेच घरातील विजेचा वापर दर तासाला संबंधित ग्राहकांना पद्वारे मोबाईलवर पाहता येणार आहे.

असा होणार फायदा

या मीटरमुळे ग्राहकांचे वीज वापरावरही थेट नियंत्रण राहणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वीजग्राहक घरातील प्रामुख्याने वॉशिंग मशिन, गिझर, एअर कंडिशनर व इतर उपकरणांचा मोठा वापर करतात. त्यात टीओडी मीटरमुळे ग्राहकांचा आर्थिक लाभ होणार आहे.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६